# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.



नियामक मंडळाची २२ वी बैठक दि.१७.१०.२०००

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २२ वी बैठक दि.१७.१०.२००० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २२/१

''ठराव करण्यात येतो की २१ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २२/२

'' ठराव करण्यात येतो की, १९९९-२००० या आर्थिक वर्षाच्या रु.१५४२.८१ कोटींच्या ताळेबंदास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.२२/३

''ठराव करण्यात येतो की,

१. २०००-२००१ या आर्थिक वर्षात रु.२१०० कोटींचा निधी उभारण्याच्या प्रक्रियेसाठी लीड ॲरेंजर्स, विश्वस्त संस्था, रेटींग एजन्सी, निबंधक (Registrar), फॉर्मस्, माहिती पुस्तके, जाहिराती, जनसंपर्क मोहीम, प्रदर्शने (त्याच्या आवश्यक साहित्यासह), जनसंपर्क सभा/परिसंवाद बैठका, शुभारंभ, वाहन व्यवस्था व दळणवळण/संपर्क सुविधा (जसे फॅक्स, दूरध्वनी, इ-मेल इ.), प्रोत्साहन रक्कम इ. वरील आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी रु.७५५.९८ लक्ष मंजूर करण्यात येत असून, हा खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत.

२. वरील (१) प्रमाणे रोखे उभारणीसाठी शासन हमी शुल्क रु.२३,७३० लक्ष माफ करण्याबाबत नियामक मंडळाची शासनास शिफारस असून, तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. २२/४

''ठराव करण्यात येतो की, नवीन विश्रामगृहे सध्या बांधण्यात येऊ नयेत.''

ठराव क्र. २२/५

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाची नियमावली तयार झाल्यावर, त्या अनुषंगाने लेखा शाखेसाठी कमीतकमी किती पदे आवश्यक आहेत याचा वित्त

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.. पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

सदस्य (महामंडळ) व सदस्य यांनी आढावा घेऊन, त्यानुसार पदनिर्मितीचा सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत मांडण्यात यावा.''

ठराव क्र.२२/६

''ठराव करण्यात येतो की, उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेला कार्यक्रम पूर्ण करण्याचे अनुषंगाने वर्ष २००१-२००२ या आर्थिक वर्षाच्या रु.२९५५ कोटीच्या अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. या अर्थसंकल्पास शासनाची मान्यता घेण्यात यावी."

ठराव क्र. २२/७

''ठराव करण्यात येतो की, आर्थिक वर्ष २०००-२००१ मध्ये महामंडळाच्या मंजूर आर्थिक कार्यक्रमांतर्गत इतर पाटबंधारे विकास महामंडळे व 'राज्य शासनाचे इतर अंगीकृत उपक्रम' यांचेकडून अल्पमुदत कर्जाद्वारे/अल्पमुदत ठेवींद्वारे निधी उभारणीसाठी अशा निधीची रक्कम, कालावधी व व्याजाचा दर ठरविणेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्याबाबत नियामक मंडळ मान्यता देत आहे.''

ठराव क्र.२२/८

''ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ व १९९८-९९ या वर्षाचे महामंडळाचे वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २२/९

''ठराव करण्यात येतो की, कार्यकारी समितीचे अधिकार, कार्य व कर्तव्ये याबाबतचा प्रस्ताव अधिक स्पष्ट स्वरुपात तयार करुन मान्यतेसाठी पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. २२/१०

''ठराव करण्यात येतो की, दि.०१.०७.२००० पासून औद्योगिक वापरासाठी मंजूर केलेल्या पाणीपुरवठ्याच्या परिमाणाची औद्योगिक वापर व पिण्यासाठी वापर अशी विभागणी न करता सदरचा वापर पूर्णपणे औद्योगिक आहे, असे समजून पाणीपट्टी आकारण्यात यावी.''

ठराव क्र.२२/११

''ठराव करण्यात येतो की, शासनाने दि.०८.०८.२००० चे क्र. कृखोवि-१०९८/(१७४/९९)/भाग-२/जसंनि अन्वये निर्गमित केलेल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे 'महामंडळाच्या अर्थविषयक सर्व बाबी वित्त सदस्य यांच्यामार्फत

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

कार्यान्वित होणे अपेक्षित आहे' यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २२/१२

''ठराव करण्यात येतो की, पाणीपट्टीची वसुली व सदर वसुलीसाठी झालेला खर्च याबाबत १९९४-९५ पासून आढावा महामंडळ स्तरावर घेण्यात यावा. तसेच याबाबतचा तपशीलवार अभ्यास सचिव (कृषि) व सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे "National Productivity Council" या संस्थेकडूनही करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. हे दोन्ही अभ्यास विचारार्थ सर्व सदस्यांना उपलब्ध करुन द्यावेत व त्यानंतर नियामक मंडळाच्या बैठकीत चर्चेसाठी मांडण्यात यावेत.''

ठराव क्र. २२/१३

'' ठराव करण्यात येतो की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी खोरे विकास महामंडळ व गोदावरी खोरे विकास महामंडळ या महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदींच्या धर्तीवर ठिबक सिंचनाचे प्रकल्प राबविण्याबाबतची तरतूद, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिनियम क्र.१५/४.४.९६ मध्ये, करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. २२/१४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाने उभारलेल्या निधींवरील शासनास द्यावयाचे हमी शुल्क त्यावरील दंडनीय व्याजासह शासनाने माफ करणे श्रेयस्कर असल्याने महामंडळाने आतापर्यंत उभारलेल्या कर्जरोख्यांवरील शासनाने आकारलेली हमी शुल्क रक्कम रु. २१२.५८ कोटी माफ करण्याबाबत नियामक मंडळाची शिफारस असून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे. तसेच महामंडळाकडून कर्जरोखे उभारण्याच्या कामामध्ये हमी शुल्क आकारु नये, अशी शासनास विनंती करण्यात यावी.''

ठराव क्र.२२/१५

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील कामांच्या निविदा स्वीकृतीपूर्वी कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता/कार्यकारी संचालक/कार्यकारी समिती अशा विविध पातळीवर सर्वात कमी देकार असलेल्या कंत्राटदाराशी निविदेच्या स्वीकृतीच्या अधिकारानुसार व अधिक्य स्वीकृतीच्या अधिकारानुसार वाटाघाटी करुन अशा वाटाघाटीअंती सदर निविदा ठराव क्र.२१/६ नुसार प्रदान केलेल्या प्राधिकाराप्रमाणे स्वीकृत करण्याच्या कार्यपद्धतीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (प्रा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## वित्तीय वर्ष २०००-२००१ मध्ये कर्जरोखे मालिकेव्दारे रु.२१०० कोटी निधी उभारण्यासाठी लागणारा खर्च

## (आवर्ती खर्चासह)

(रु.लाख)

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | | अनावर्ती खर्च | |
| | १ | लिड अरेंजर्स | ४२०.०० |
| | २ | विश्वस्त संस्था | ०.७५ |
| | ३ | रजिस्ट्रार्स | ७.७४ |
| | ४ | बँकर्स फिस | ०.६० |
| | ५ | माहिती पुस्तके, लेटर्स ऑफ अॅलॉटमेंट, बॉण्ड सर्टिफिकेटस् | २.४० |
| | ६ | शुभारंभ, जनसंपर्क बैठका इ. | २०.०० |
| | | एकूण (अ) : | ४५१.४९ |
| ब. | | आवर्ती खर्च | |
| | १ | रेटींग सर्व्हेलन्स फिस (५ वर्षाची) | १४१.०४ |
| | २ | रजिस्ट्रार्स फिस (५ वर्षाची) | ८.९५ |
| | ३ | लिस्टींग फिस (५ वर्षाची) | ४०.३० |
| | ४ | विश्वस्त संस्थांची फिस (५ वर्षाची) | ११४.२० |
| | | एकूण (ब) : | ३०४.४९ |
| | | एकूण (अ + ब) : | ७५५.९८ |
| क | १ | शासन हमीशुल्क (५ वर्षाचे) | २३७३०.०० |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
Resolution dir meet 22

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे